नि.दि.दा.क्र.३०/२०१८ नि.क्र. ८९

IA No./2/2019

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.३०/२०१८ मधील आदेश नि.क्र.८९</u>**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन दुय्यम पुरावा सादर करण्याची परवानगी मागीतलेली आहे.

२. वादीच्या अर्जातील कथन असे आहे की, वादीने प्रतिवादी विरुध्द साठेखतावरुन खरेदीखत होऊन मिळण्याकरीता दावा दाखल केलेला आहे. वादीने पुराव्याच्या दरम्याने दस्ताची यादी निशाणी ४ सोबत अनुक्रमांक ५ वर प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. २ च्या नांवे लिहून दिलेल्या कुलमुख्त्यार पत्राची प्रत दाखल केली आहे. सदर कुलमुख्त्यार पत्राची प्रत ही प्रतिवादी क्र. २ च्या ताब्यात आहे. सदर कुलमुख्त्यार पत्राची दस्त पुराव्यात वाचने न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर दाव्याच्या कामी सदर कुलमुख्त्यार पत्राचा दस्त शाबीतीचा विचार करता सदर दस्त दुय्यम पुरावा म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे. सबब सदर दि. २०/०४/२००७ रोजीचा कुलमुख्त्यार पत्राचा दस्त दुय्यम पुरावा म्हणून स्वीकारण्यात यावे.

३. प्रतिवादी नं.१ यांनी नि.९१ नुसार आपले म्हणणे दाखल करुन सदर अर्जास प्रखर विरोध केला आहे. आपल्या म्हणण्यात त्यांनी असे नमुद केले आहे की, तथाकथीत दस्त हस्तगत करणेकामी वादीने काय कायदेशीर बाबींचा अवलंब केला त्यांनी तो खुलासा केलेला नाही. तसेच केवळ मोघम विधानावरुन कथीत झेरॉक्स प्रतीला दुय्यम पुरावा म्हणून वाचण्याबाबत परवानगी देता येणार नाही. सबब अर्ज खारीज होण्यास पात्र आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले तसेच उभयपक्षांतर्फे त्यांचे सुविज्ञ अधिवक्त्यांचे सविस्तर युक्तीवाद ऐकले.

५. वादीतर्फे त्यांच्या अर्जाप्रमाणेच युक्तीवाद केले की, प्रतिवादी क्र. १ ने करुन दिलेले कुलमुख्त्यार पत्र प्रतिवादी क्र. २ च्या ताब्यात आहे. त्यामुळे वादीने दाखल केलेले सदर दि. २०/०४/२००७ रोजीचे कुलमुख्त्यार पत्राची प्रमाणित प्रतीला दुय्यम पुरावा म्हणून वाचण्यात यावे. तर प्रतिवादीतर्फे म्हणणयाप्रमाणेच

युक्तीवाद केले की, दुय्यम पुराव्याच्या अनुषंगाने वादीने कोणते कायदेशीर बाबीचा अवलंब केला याचा खुलासा नसल्याने दुय्यम पुरावा सादर करण्याची परवानगी मिळण्यास वादी पात्र नाही.

६. वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे दि. २०/०४/२००७ रोजीच्या कुलमुख्त्यार पत्राच्या प्रतीच्या प्रमाणित प्रतीस दुय्यम पुरावा म्हणून वाचण्याबाबत प्रस्तुत अर्ज देऊन अशी प्रार्थना केली आहे. परंतु या ठिकाणी एक बाब प्रामुख्याने नमुद करावयाशी वाटते की, एखाद्या प्राथमिक पुराव्याच्या अनुषंगाने जर दुय्यम पुरावा द्यावयाचा असल्यास त्याबाबत भारतीय पुरावा अधिनियमचे कलम ६५ च्या तरतुदीची पालन होणे आवश्यक आहे व त्या अनुषंगाने वादीने अथवा प्रतिवादीने त्या अनुषंगाने पुरावा सादर करणे अपेक्षित आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी ***कार्तिक गंगाधर भट विरुध्द निर्मला नामदेव वाघ, रिट पिटिशन नं.११९५१/१८*** या न्यायनिर्णयामध्ये असे ग्राहय धरले आहे की, दुय्यम पुरावा सादर करण्यास न्यायालयाची परवानगी मागण्याची आवश्यकता नसून कायद्यात सुध्दा ते अभिप्रेत नाही. सबब या प्रकरणात पुढे आलेली परिस्थीती व वर नमुद कारण विचारात घेता वादीने या अर्जाद्वारे दुय्यम पुरावा सादर करणेबाबत परवानगी मागीतलेली आहे ती परवानगी देणे अथवा नाकारणेचा प्रश्न उद्भवत नाही. सबब वादीचा अर्ज नस्तीबंद होण्यास पात्र आहे.

## आदेश

दुय्यम पुरावा सादर करण्याची परवानगीबाबत तरतुद नसल्याने सदरची परवानगी देणे अथवा नाकारणेचा प्रश्न उद्भवत नसलेने प्रस्तुत अर्ज नस्तीबंद करण्यात येते.

स्वाक्षरीत/-

दि. ०२/०४/२०१९

(मि. वि. बुराडे)

३रे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,

पंढरपूर

# CERTIFICATE

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | P. D. Phutane, Stenographer L. G. |
| Court | : | 3rd Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 02-04-2019 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 02-04-2019 |
| Judgment/Order uploaded on: | | 02-04-2019 |